शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

# इ.११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२४-२५.

(मुंबई महानगर पालिका क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगर पालिका क्षेत्रांसाठी)

प्रवेशाचे दैनिक नियोजन

**दैंनदिन गुणवत्ता फेरी / Daily Merit Round (DMR)** (सतत विशेष फेरी)

| वार | दिनांक | दैनिक फेरीसाठी अर्ज करणे | विद्यार्थ्यांसाठी प्रवेशासाठी वेळ | विद्यालयांसाठी अतिरिक्त वेळ | उद्यासाठी अर्ज करणे |
|---|---|---|---|---|---|
| ** | कार्यवाही | अर्ज लॉक करणे | Proceed for Admission | Upload admission status | Part 2nd unlocked |
| मंगळवार | ०१/१०/२०२४ | स.०८ वा पासून | * | * | * |
| बुधवार | ०२/१०/२०२४ | * | * | * | * |
| गुरुवार | ०३/१०/२०२४ | स.०८ वा पर्यंत | स.१० ते सायं.०४ | सायं.०५ वा पर्यंत | सायं.०६ वा पासून |
| शुक्रवार | ०४/१०/२०२४ | स.०८ वा पर्यंत | स.१० ते सायं.०४ | सायं.०५ वा पर्यंत | सायं.०६ वा पासून |
| शनिवार | ०५/१०/२०२४ | स.०८ वा पर्यंत | स.१० ते सायं.०४ | सायं.०५ वा पर्यंत | DMR Ends |

सुचना-

१.दैनंदिन गुणवत्ता फेरी अर्थात सतत विशेष फेरी गुणवत्तेवर अधारित असेल, निवडलेल्या आणि प्रतिक्षाधीन विद्यार्थ्यांची यादी दररोज सकाळी १० वाजता घोषित केली जाईल यासाठी विद्यार्थ्यांना दररोज नव्याने अर्ज करावा लागेल.

२.संध्याकाळी ०६ ते दुसऱ्या दिवशी ०८ वा पर्यंत, दैनंदिन गुणवत्ता यादीसाठी विद्यार्थी अर्ज करु शकतील. (विद्यार्थी त्याच्या पसंतीच्या अर्जामध्ये किमान -१ आणि कमाल-१० विद्यालायांची पंसती नोंद करु शकतील.)

३.प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थाना दुसऱ्या दिवशीच्या गुणवत्ता यादीसाठी वरील वेळेत दररोज अर्ज करावा लागेल विद्यार्थांची पसंती फक्त त्या दिवसासाठी वैध राहील. दिलेल्या वेळेत विद्यार्थाला दररोज त्याचा अर्ज पुन्हा लॉक करावा लागेल.

४.फक्त तेच विद्यार्थी ( ज्यानी दररोज वेळेत फॉर्म लॉक केले आहेत) दुसऱ्या दिवशीच्या गुणवत्ता यादीसाठी विचारात घेतले जातील.

५.सकाळी १० वाजता अर्ज केलेल्या विद्यार्थांची निवड आणि प्रतिक्षा यादीतील स्थिती दररोज घोषित केली जाईल. उमेदवारांच्या याद्या कनिष्ठ महाविद्यालयांनाही दाखवल्या जातील.

६.विद्यार्थांची प्रत्येक विद्यालयाच्या यादीतील स्थान (निवड किंवा प्रतीक्षा क्रमाक) विद्यार्थांना दाखवली जाईल. विद्यार्थी निवड झाल्ेल्या कोणत्याही ज्युनिअर कॉलेजमध्ये (दिलेल्या वेळेत) प्रवेशासाठी जाऊ शकतो. Proceed For Admission.

७.सकाळी १० ते ०४ वा पर्यंत विद्यार्थी निवडलेल्या विद्यालयात त्यांचा प्रवेश निश्चित करु शकतात.

८.संध्याकाळी ०५ वा पर्यंत विद्यालय पोर्टलवर प्रवेशाची स्थिती अपलोड करू शकतात. यानंतर सर्व प्रवेश न झालेले अर्ज मुळ स्थितीत Reset केले जातील आणि दुसऱ्या दिवशी साठी अर्ज करणेस संध्याकाळी ०६ वाजता सुरुवात होईल.

९.रिक्त जागांच्या तपशील वेळोवळी सुधारित होईल. पुढील अर्ज भरणेपूर्वी रिक्त जागांचा तपशील तपासावा.

१०.वेळापत्रकानुसार या वरील प्रमाणे कार्यवाहीची दररोज पुनरावृत्ती होईल.

११.नविन विद्यार्थासाठी Student Registration/ नवीन नोंदणी दिनांक ०१/१०/२०२४ रोजी सकाळी ८.०० वाजलेपासून ते दिनांक ०३/१०/२०२४ रोजी सकाळी ८.०० वाजेपर्यंत सुरु राहील.

१२.प्रवेश अर्जाचा भाग-१ भरुन प्रमाणित झाला असलेल्या विद्यार्थाना भाग-२ DMR पसंती देऊन फेरीमध्ये सहभागी होता येईल.

१३.विद्यार्थ्याने आपली Waitlist Rank तपासुन दररोज (भाग-२) DMR पंसती नोंदविणे आवश्यक आहे.

## DMR दरम्यान परवानगी असलेल्या आणि प्रतिबंधित कृती

| ** | परवानगी दिलेल्या कृती | प्रतिबंधित |
|---|---|---|
| नेहमी सुरु असणार | विद्यार्थी नोंदणी, अर्ज भाग-१ भरणे, आणि अर्ज प्रमाणिकरण,कोटा जागा समर्पण,अर्ज तसेच प्रवेश करणे,द्विलक्षी अभ्यासक्रमासाठी आणि प्रवेश | * |
| दिन- स.१० ते सायं.०५ | प्रवेश पुष्टीकरण, नकार आणि रद्द करणे. | भाग-२ अनलॉक करता येणार नाही |
| रात्र- सायं.०६ ते स.०८ | भाग-२ पसंती नोंदविणे आणि त्यामध्ये दररोज बदल करणे. पसंती अर्ज लॉक करा (दररोज अनिवार्य) | * |

या नंतर सन-२०२४-२५ मधील प्रवेश प्रक्रिया पुर्ण होईल व प्रवेशाची कार्यवाही बंद करण्यात येईल.

पुणे,

दिनांक-२७/०९/ २०२४

शिक्षण सहसंचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे - १.**

# इ.११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२४-२५.

**(मुंबई महानगर पालिका क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगर पालिका क्षेत्रांसाठी)**

**दैनंदिन गुणवत्ता फेरी / Daily Merit Round (DMR)** **(सतत विशेष फेरी)**

इ.११ वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिये अंतर्गत आता पर्यंत तीन नियमीत फेऱ्या, सहा विशेष फेऱ्यांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरीही आणखी काही निवडक विद्यार्थी इ.११ वी प्रवेशासाठी प्रतीक्षेत दिसुन येत आहेत. त्यांना प्रवेशासाठी प्रवेशाची अखेरची संधी मिळावी. या शैक्षणीक वर्षातील प्रथम सत्र संपत आले आहे. सबब, प्रवेश प्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक आहे यासाठी, दैनंदिन गुणवत्ता फेरी DMR अर्थात सतत विषेश फेऱ्यांचे आयोजन दिनांक ०५/१०/२०२४ रोजा पर्यंत करण्यात येईल. विद्यार्थ्यंना इ.११वी मध्ये प्रवेशासाठी ही अंतिम संधी असेल.

यापूर्वी घेण्यात आलेल्या प्रवेश फेऱ्यांमध्ये अलॉटमेंट देत असतांना केवळ एकच विद्यालय (विद्यार्थी पंसतीनुसार) ALLOT केले जाते यामुळे प्रत्येक फेरीमध्ये काही विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार अलॉटमेंट मिळत नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळावी आणि विद्यार्थ्यांना त्यांनी पसंती दर्शविलेल्या विद्यालयात प्रवेशासाठी प्रतिक्षा यादिमधील स्थान समजावे यासाठी पुढील प्रमाणे दैनंदिन गुणवत्ता फेरी DMR अर्थात सतत विषेश फेरीचे आयोजन करण्यात येत आहे.

**सतत विशेष फेरी- Daily Merit Round (DMR)**

१. **दैनंदिन गुणवत्ता फेरी** ही नावा प्रमाणे दररोज नवीन असेल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळापत्रकात दिलेल्या वेळेत दररोज अर्ज करणे आवश्यक राहिल. अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी एक दिवस मिळेल. त्या दिवसात प्रवेश न घेतल्यास त्या दिवसासाठी दिलेली पसंती रद्द समजली जाईल व पुढील दिवसांसाठी त्यांना पुन्हा अर्ज करता येईल.

२. दैनंदिन गुणवत्ता फेरीमध्ये विद्यार्थ्यांने पंसती दर्शविलेल्या प्रत्येक विद्यालयाचे प्रतिक्षा यादीमधील त्याचे स्थान Rank विद्यार्थ्यास पाहता येईल. त्यांमध्ये निवड SELECTED यादी व प्रतीक्षा यादी WAITLISTED यांचा समावेश असेल.

३. विद्यालयामध्ये किती जागा रिक्त आहेत तेवढे विद्यार्थी त्या विद्यालयाचे SELECTED निवड यादीमध्ये समाविष्ट होतील आणि उर्वरित अर्ज केलेले विद्यार्थी WAIT LISTED प्रतिक्षाधिन असतील.

४. SELECTED यादीमध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही विद्यालयात विद्यार्थ्यास PROCEED FOR ADMISSION करुन प्रवेशासाठी जाता येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक विद्यालयात प्रवेशाची संधी मिळू शकेल. विद्यार्थ्यांने SELECTED पैकी एकाची स्वतः निवड करुन त्याच दिवशी प्रवेशासाठी जाणे आवश्यक असेल.

५. दररोज पसंती, दररोज सुधारित गुणवत्ता यादी हे या प्रवेश फेरीचे वैशिष्टय आहे. विद्यार्थ्यांनी समजावून घ्यावे आपला प्रवेश दिलेल्या वेळेत निश्चित करावा.

**याची नोंद घ्या.**

मागील वर्षी DMR ROUND मध्ये असे निदर्शनास आले आहे की, काही विद्यार्थी संबधित विद्यालयात Select होऊनही प्रवेशासाठी जात नाहीत, त्यामुळे त्या विद्यालयातील जागा भरण्याऐवजी अडवल्या आहेत. त्यामुळे आता असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, DMR ROUND मध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला कोणत्याही एका कॉलेजमध्ये SELECT होण्यासाठी एकच संधी मिळेल. यामुळे कोणत्याही विद्यालयात एकदा APPLY झाल्यानंतर जर त्या विद्यार्थ्याने SELECTED कॉलेजमध्ये प्रवेश घेतला नाही तर, अशा विद्यार्थ्याला दुसऱ्या दिवसासाठी त्या कॉलेजसाठी APPLY करता येणार नाही. (विद्यार्थ्यांना एकदा APPLY झालेल्या कॉलेजमध्ये DMR APPLY साठी प्रतिबंधित/ BAR करण्यात येईल.) अशा विद्यार्थ्यांना ११ वी मध्ये प्रवेश मिळवण्यासाठी इतर कॉलेजसाठी DMR APPLY करता येईल. दररोज नव्याने APPLY करणे आवश्यक आहे. तरी * SELECTED यादिमधील कोणत्याही एका विद्यालयात प्रवेशासाठी त्याच दिवशी जावे अन्यथा त्या विद्यालयास तुम्हाला पुन्हा APPLY करता येणार नाही. *

सोबत DMR सतत विशेष फेरीचे तपशीलवार वेळापत्रक संलग्न आहे त्यानुसार कार्यवाही करावी.